# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८/ अग्रहायण ६, १९४० (शके)**

१८५ महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी, सकाळी ११.३० वाजता **अवर सचिव, श्री. उमेश शिंदे, यांचे दालन क्रमांक १५०१, पंधरावा मजला, विधान भवन, मुंबई येथे** संगणकीय आज्ञावलीव्दारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहू ठराव शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत:-

**(शुक्रवार, दिनांक २० जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला अशासकीय ठराव) —**

**(१) श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटूंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

**(२) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११८ —**

"राज्यात वेळोवेळी पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता, पावसाळा संपत असतानाच पुढील वर्षभरासाठी राज्यातील पाणीसाठा जतन करण्याची आवश्यकता, राज्यातील जनतेला लागणारे पिण्याचे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी, औद्योगिक वसाहती व कारखान्यांना आणि अन्य घटकांना लागणाऱ्या पाण्याचे न्याय वाटप होऊन प्रत्येकाला पुरेसे पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच विभागवार घेतली जाणारी पिके त्या भागातील उपलब्ध पाणीसाठा व लोकसंख्या यांचा विचार करून प्रत्येक घटकाला वर्षभर पाणी कसे पुरेल याबाबत पूर्वनियोजन करून त्याची शासनस्तरावर काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(३) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १०७ —**

"कोकणातील आंबा, काजू, भात, भुईमूग इत्यादी पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीत धान्य, तेलबिया, इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यात आलेली सर्वकष पिक विमा योजना रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे व रायगड या जिल्ह्यातील फळपिकांना लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

..2/-

**(४) श्री.जनार्दन चांदूरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ११२ —**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(५) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २९ —**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींनी रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षांत नोकरी न मिळालेल्या सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरु करावा, तसेच रोजगारासाठी भाग भांडवलाची सोय करावी, त्याचप्रमाणे निवडणूक, जनगणना विषयक कामे शिक्षकांना देण्याऐवजी सुशिक्षित बेरोजगारांना देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(६) प्रा.जोगेंन्द्र कवाडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५१ —**

"राज्यातील अनेक भागात पुरातन बौध्द स्तूप, लेण्यांच्या भग्न वास्तूची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास येत आहे, काही भागातील बौध्द स्तूप व लेण्यांना अनधिकृत बांधकामांचा विळखा पडलेला दिसून येतो, या पुरातन वास्तूंच्या बांधकामावर झोपडपट्टयांचा विळखा पडलेला आहे, या बौध्द स्तूप व लेण्यांविषयीच्या माहितीचा उल्लेख पुरातत्व शास्त्रज्ञांच्या शोध प्रबंधामध्येही आढळून येतो, या पुरातन वास्तूचे जतन व संवर्धन होण्याकरिता शासनाने धोरण ठरवून त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ नोव्हेंबर, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)
८) एम.के.सी.एल.कक्ष.